# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः04.11.2024** **वारःसोमवार**

1. विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा आज शेवटचा दिवस. बंडखोरी आणि मैत्रीपूर्ण लढती टाळण्याचं प्रमुख पक्षांपुढे आव्हान.
2. देशभरात भाऊबीजेचा सण मोठ्या उत्साहात साजरा.
3. देशातील 97 पूर्णांक 5 टक्के शाळांमध्ये मुलींसाठी स्वच्छतागृहांची सुविधा आणि
4. कसोटी क्रिकेटमध्ये 24 वर्षांनंतर भारताचा घरच्या मैदानांवर संपूर्ण पराभव

**अर्ज मागे**

विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा आज शेवटचा दिवस आहे. 288 मतदारसंघांमधुन एकंदर 7 हजार 73 उमेदवारी अर्ज वैध ठरले आहेत. मराठवाड्यातल्या मतदारसंघांमध्ये सर्वाधिक उमेदवार आहेत तर कोकणात उमेदवारांची संख्या अतिशय मर्यादित आहे. नांदेड जिल्ह्यातल्या भोकर विधानसभा मतदारसंघात सर्वाधिक म्हणजे 140 उमेदवारांचे अर्ज वैध ठरले आहेत. त्याखालोखाल बीड जिल्ह्यात माजलगाव मतदारसंघात 98, तर बीडमध्ये 90 उमेदवारांचे अर्ज वैध आहेत.

राज्यात महाड विधानसभा मतदारसंघात सर्वात कमी म्हणजे फक्त 5 उमेदवारांचे अर्ज वैध ठरले आहेत. मुंबईत चेंबूर, माहीम आणि सिंधुदुर्गातल्या सावंतवाडीत प्रत्येकी 6, तर शिवडी आणि कुडाळमध्ये 7 उमेदवारांचे अर्ज ग्राह्य धरण्यात आले आहेत. दरम्यान भाजपाचे 99 टक्के बंडखोर, आपला  उमेदवारी अर्ज मागे घेतील असा विश्वास प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला आहे. जे बंडखोर उमेदवारी अर्ज मागे घेणार नाहीत, त्यांना 6 वर्षांसाठी पक्षातून निलंबित करू असा इशारा त्यांनी दिला आहे.

**आरपीआय**

रिपब्लिकन पक्ष महायुतीचा घटक पक्ष असल्यानं विधानसभा निवडणुकीत महायुतीला विजयी करण्यासाठी रिपब्लिकन कार्यकर्त्यांनी प्रयत्न करावेत असं आवाहन रिपब्लिकन पक्षाचे महाराष्ट्र राज्य सरचिटणीस गौतम सोनवणे यांनी केलं आहे. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या आदेशानुसार कार्यकर्त्यांनी नाराजी बाजूला ठेवून महायुतीच्या उमेदवारांचा प्रचार करावा आणि ज्यांनी उमेदवारी अर्ज भरले आहेत; त्यांनी आपले अर्ज मागे घ्यावेत असंही सोनवणे यांनी म्हटलं आहे.

**शिंदे**

'आम्ही हप्ते भरणारे आहोत तर आधीचे सरकार हप्ता वसुली करणारे होते', अशी टीका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल विरोधकांवर केली. कुर्ला मतदारसंघाचे उमेदवार मंगेश कुडाळकर आणि अंधेरी पूर्व मतदार संघातील उमेदवार मुरजी पटेल यांच्या प्रचार सभेत ते बोलत होते. काँग्रेसनं राजस्थान, हिमाचल प्रदेश, कर्नाटक या राज्यांमध्ये निवडणुकीत खोटी आश्वासनं दिली आणि मतं मिळवली. सत्तेत आल्यावर काँग्रेसनं पैसे नाहीत असं सांगून हात वर केले. मात्र आम्ही शब्द पाळणारे आहोत असं शिंदे म्हणाले.

**<u>भाऊबीज</u>**

देशभरात भाऊबीजेचा सण काल मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना भाऊबीजेच्या शुभेच्छा दिल्या. या सणामुळं भावाबहिणींमधलं प्रेम अधिक घट्ट होईल, असं त्यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. गृहमंत्री अमित शहा यांनीही समाजमाध्यमावरून शुभेच्छा दिल्या. प्रेम, समर्पणभाव आणि भक्तिभावाचा हा सण सर्वांच्या आयुष्यात भरभरून आनंद घेऊन येईल, असं त्यांनी म्हटलं.

**<u>मुली स्वच्छतागृहे</u>**

देशातील 97 पूर्णांक 5 टक्के शाळांमध्ये मुलींसाठी स्वच्छतागृहे असल्याची माहिती केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्रात दिली आहे. यामुळे मुलींचं शाळा गळतीतील प्रमाण घटलं असल्याचं सांगताना शाळेत जाणाऱ्या किशोरवयीन मुलींना सॅनिटरी पॅड पुरवण्याबाबत राष्ट्रीय धोरण तयार करण्याच्या अंतिम टप्प्यात असल्याचं केंद्र सरकारनं म्हटलं आहे. स्वच्छतागृहाच्या अभावामुळे अनेक मुली शिक्षण सोडत असत. सर्वोच्च न्यायालयाने एका जनहित याचिकेवर सुनावणी करताना केंद्राला देशभरातील सर्व सरकारी अनुदानित आणि निवासी शाळांमधील विद्यार्थिनींच्या संख्येनुसार शौचालय बांधण्यासाठी राष्ट्रीय मॉडेल तयार करण्याचे निर्देश दिले होते. जनहित याचिकेत केंद्र आणि राज्यांना इयत्ता सहावी ते बारावीच्या विद्यार्थिनींना मोफत सॅनिटरी पॅड उपलब्ध करून देण्यासाठी आणि सर्व सरकारी, सरकारी अनुदानित आणि निवासी शाळांमध्ये महिलांसाठी स्वतंत्र शौचालय सुविधा सुनिश्चित करण्यासाठी निर्देश देण्याची मागणी केली होती असं हिंदुस्थान समाचार या वृत्तसंस्थेनं आपल्या बातमीत म्हटलं आहे.

**<u>कोकण शेती-रत्नागिरी</u>**

कोकणातली शेती फायद्याची होत नाही आणि या भूमीत सहकार रुजत नाही, असं म्हटलं जातं; मात्र हे समज खोडून काढण्यासाठी अनेक प्रयोगशील हात राबत आहेत. अनेक समस्यांमुळं आतबट्ट्याची होऊन घटत चाललेली शेती आणि कोकणातून होणारं स्थलांतर या गंभीर परिस्थितीवर उपाययोजनांसाठी रत्नागिरीच्या चिपळूण तालुक्यातल्या दिशान्तर संस्थेनं विचारमंथन केलं. याविषयी अधिक माहिती जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून...

**वेहेळे राजवीरवाडीमध्ये संस्थेने 2014 मध्ये शेतकरी महिलांच्या साथीने शाश्वत उपजीविकेचा अन्नपूर्णा प्रकल्प सुरू केला. पालेभाज्या, वेलवर्गीय भाज्या, कडधान्यं आणि कलिंगड या पिकांची सेंद्रिय पद्धतीने शेती सुरू करून दलालमुक्त विक्रीसाठी चिपळूणमध्ये विक्री केंद्र उभारण्यात आलं. नागरिकांना शिवारफेरी घडवल्यामुळे विक्रीसाठी मोठा उपयोग झाला. गटाने स्वमालकीचं वाहनही घेतलं. बंधारा बांधून एक कोटी वीस लाख लिटर पाणी अडवण्यात आलं. संस्थेतर्फे मार्गदर्शनासह मिळालेलं सर्व प्रकारचं साह्य आणि स्वतःचे कष्ट यांच्या जोरावर या महिलांच्या गटाने दर वर्षीच्या रब्बी हंगामात सरासरी सहा लाख रुपयांची उलाढाल केली. दशकपूर्ती होताना त्यांच्या एकूण उलाढालीने साठ लाख रुपयांचा टप्पा ओलांडला आहे. अलीकडेच झालेल्या कार्यक्रमात या वर्षीचा श्रम सन्मान म्हणून महिलांना दोन लाख 96 हजार रुपयांचं वितरण करून उर्वरित रक्कम पुढच्या हंगामासाठी ठेवण्यात आली आहे. महात्मा गांधीजींच्या संदेशानुसार खेड्यांच्या पुनर्जागरणाचा हा एक प्रामाणिक प्रयत्न असल्याची भावना दिशान्तरचे संस्थापक अध्यक्ष राजेश जोष्टे यांनी व्यक्त केली. शेतीतून स्वयंपूर्ण झाल्याचं अभिमानाने सांगतानाच प्रेरणा देऊन सहकार्य करणाऱ्या संस्थेबद्दल महिलांनी कृतज्ञता व्यक्त केली. अनेक संकटं आली तरी जिद्दीने केलेले सातत्यपूर्ण कष्ट, शिस्त आणि पारदर्शकता यांमुळे हे यश मिळाल्याचं पदाधिकाऱ्यांनी नमूद केलं. कोकणातल्या शेतीसाठी ही यशोगाथा आशेचे दीप उजळणारी आहे. आकाशवाणी बातम्यांसाठी अनिकेत कोनकर, रत्नागिरी**

**<u>कापूस-नाना पटोले</u>**

शेतकऱ्यांचं हित लक्षात घेऊन केंद्र सरकारनं कापसाच्या आयातीवर तत्काळ बंदी घालून भारतीय कापूस महामंडळाला हमीभावानं कापूस खरेदी करण्याचे निर्देश द्यावेत, अशी मागणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून केली आहे. कापूस उत्पादनात महाराष्ट्र देशातील दुसऱ्या क्रमांकाचं राज्य असून 40 लाखांपेक्षा जास्त शेतकरी कापसाचं

उत्पादन घेतात. भारतीय कापूस महामंडळाकडेही विक्री न झालेल्या 11 लाख कापूस गाठी पडून आहेत. सध्या कापसाचे भाव 6500 ते 6600 रुपये प्रति क्विंटल असून हा भाव 7122 रुपये या हमीभावापेक्षा कमी आहे. बाजारात कापसाला भाव नसल्याने शेतकऱ्यांनी कापूस विकलेला नाही. केंद्र सरकारने शेतकऱ्यांचे हित लक्षात घेऊन कापूस आयातीवर बंदी घालावी, असं नाना पटोले यांनी आपल्या पत्रात म्हटलं आहे.

**दिवाळी-परभणी**

परभणी जिल्ह्यातील पालम तालुक्यातील चाटोरी परिसरातील नागरिकांनी भारतीय सैन्यात कार्यरत असलेले सैनिक आणि त्यांच्या कुटुंबीयांसहित 'कृतज्ञता सोहळा' आयोजित करून दिवाळी साजरी केली. मागील पाच वर्षांपासून विविध गावात जाऊन अशा प्रकारचा 'सैनिक कृतज्ञता सोहळा' आयोजित केला जातो. यावर्षी चाटोरी पंचक्रोशीतील भारतीय सैन्य दलात सेवारत असलेल्या 25 सैनिकांच्या सन्मानार्थ आयोजित या कार्यक्रमाच्या वेळी सैनिक आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्यांचा मानपत्र, शाल, श्रीफळ तसंच पुष्पहार देऊन सन्मान करत, दिवाळी साजरी करण्यात आली.

**निधन-गडचिरोली**

आरमोरी विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार हरिराम वरखडे यांचे शनिवारी रात्री नागपुरातील एका खासगी रुग्णालयात दीर्घ आजारामुळे निधन झाले. ते 83 वर्षांचे होते. आरमोरी तालुक्यातील जोगीसाखरा या त्यांच्या मूळ गावी त्यांच्या पार्थिवदेहावर काल अंत्यसंस्कार करण्यात आले. हरिराम वरखडे हे 1990 मध्ये ते शिवसेनेकडून आरमोरी विधानसभा मतदारसंघातून निवडून आले होते.

**क्रिकेट**

भारतीय क्रिकेट संघातील वरच्या फळीतील फलंदाजांच्या हाराकिरीमुळे भारताला 24 वर्षांनंतर घरच्या मैदानावर कसोटी मालिका गमवावी लागली. 2000 सालानंतर पहिल्यांदाच, भारतीय संघाला मायदेशात झालेल्या कसोटी मालिकेतला एकही सामना जिंकला आलेला नाही. भारत आणि न्यूझीलंड यांच्यातल्या कसोटी क्रिकेट मालिकेतल्या मुंबईतील वानखेडे मैदानावर खेळल्या गेलेल्या तिसऱ्या आणि अखेरच्या कसोटी सामन्यात न्यूझीलंडनं भारताचा 25 धावांनी पराभव केला, आणि मालिका 3-0 अशी जिंकली.

सामन्याच्या तिसऱ्या दिवशी काल सकाळच्या सत्रात न्यूझीलंडचा दुसरा डाव 174 धावांवर आटोपला. रविंद्र जडेजानं दोन्ही डावांत प्रत्येकी 5 गडी बाद करत, सामन्यात एकंदर 10 बळी घेतले. भारतासमोर विजयासाठी 147 धावांचं आव्हान होतं. मात्र न्यूझीलंडच्या फिरकी गोलंदाजांसमोर भारताची फलंदाजी कोलमडल्याने भारताचा दुसरा डाव 121 धावांत संपुष्टात आला. 64 धावा करणाऱ्या ऋषभ पंतशिवाय कोणत्याही फलंदाजाला खेळपट्टीवर तग धरता आला नाही. न्यूझीलंडच्या एजाज पटेल यानं दुसऱ्या डावात भारताचे 6 गडी बाद करत सामन्यात 11 बळी टिपले. पटेल सामनावीर तर न्यूझीलंडचा संयमी फलंदाज विल यंग मालिकावीर ठरला.

**हवामान**

कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. उद्यापासून सर्वत्र हवामान सूर्यप्रकाशयुक्त कोरडं राहील.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

## नमस्कार.